FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

पोलीस स्टेशन हिंगोली (शहर) जि. हिंगोली

1. **District** (जिल्हा): हिंगोली **P.S.**(ठाणे): हिंगोली शहर

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0005 **Year** (वर्ष): 2026

Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 01/01/2026 20:28

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरूवार **Date From** (दिनांक पासून): 01/01/2026
Time Period (कालावधी): पहर 5 **Date To** (दिनांक पर्यंत): 01/01/2026
Time From (वेळेपासून): 12:35 बजे
Time To (वेळेपर्यंत): 13:10 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक): 01/01/2026 **Time** (वेळ): 19:48 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ):
Entry No. (नोंद क्र.): 023
Date & Time (दिनांक आणि वेळ): 01/01/2026 19:48 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
उत्तर, 02 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): सरकारी दवाखाण्या जवळ ,रिसाला बाजार,हिंगोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): VIKAS MAROTI GANWAT

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 02/10/1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	JALGAON,JALGAON,एम.आई.डी.सी,जळगाव,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	JALGAON,JALGAON,एम.आई.डी.सी,जळगाव,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9822259932

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	उमेश साहेबराव सरकटे			1. मौजे हराळ,सेनगाव ,रिसोड , वाशिम,महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत):
सरकार तर्फे फिर्याद

ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली.

दिनांक 01/01/2026

मी, विकास मारूती घनवट, वय 44 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली मो.नं. 9822259932
सरकार तर्फे फिर्यादी होऊन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन, आक्टोबर 2024 पासून पोलीस उप अधीक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे नेमणूकीस आहे.
मी दिनांक 31.12.2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय हिंगोली येथे हजर असतांना तक्रारदार भागवत वामन दाहिरे, वय 30 वर्ष, व्यवसाय कृषी केंद्र चालक, रा. इंदिरा नगर, सेनगांव, ता.सेनगांव, जि.हिंगोली. ह.मु. पोळा मारोती जवळ, मंगळवार बाजार, हिंगोली यांनी तक्रार दिली की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन माझे बिएस्सी.अँग्री शिक्षण झालेले आहे. माझे सेनगांव येथे तहसिल कार्यालयाचे समोर टी पॉइंट येथे पाटील कृषी सेवा केंद्र अँन्ड मशनरीज नावाचे दुकान असुन सदर दुकान मी चालवितो.
माझेकडे कृषी सेवा केंद्राचा परवाना आहे, परंतु जि.एस.टी. क्रमांक नाही. मला व्यवसायासाठी जि.एस.टी. क्रमांक आवश्यक असल्याने तो मिळण्यासाठी मी, दिनांक 08 सप्टेबर 2025 रोजी वस्तु व सेवा कर कार्यालय, सरकारी दवाखान्याजवळ, रिसाला बाजार, हिंगोली येथुन ऑन लाईन अर्ज केलेला आहे. त्यानंतर व्हि.एस. राउत, प्रोफेशनल टॅक्स ऑफिसर यांचे सहीने मला दि.10.10.2025 रोजी नोटीस काढली. त्यामध्ये मला त्यांनी दिनांक 19.12.2017 ते दिनांक 31.03.2025 दरम्यानचा प्रोफेशन टॅक्स, त्यावरील व्याज व दंड असे मिळुन 43,904/-रू भरण्यासाठी नोटीस काढली होती. सदर नोटीस घेवुन सरकटे दिनांक 29.12.2025 रोजी माझे सेनगांव येथील दुकानावर आले होते. तेव्हा मी बाहरेगांवी असल्यामुळे माझे दुकानावरील मुनीम पुरूषोत्तम शिवाजी वाणी यांनी सदरची नोटीस घेतली नाही. त्यावेळी वाणी यांनी त्यांचे फोनवरून माझे सरकटेशी बोलणे करून दिले होते. तेव्हा मी त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी उमेश सरकटे असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, मी हिंगोलीलाच राहतो, उद्या हिंगोली येथे आल्यावर मी तुम्हाला भेटतो. त्यानंतर दिनांक 30.12.2025 रोजी मला सरकटे यांनी माझे फोनवर फोन करून तुम्हाला काढलेली नोटीस मी कॅन्सल करतो आणी त्यामध्ये लावण्यात आलेला प्रोफेशनल टॅक्स, त्यावरील व्याज आणि दंड असे 43,904/-रू भरायचे नसेल, अन अँडजेसमेंट करायची असेल तर त्यासाठी 30,000/- रू लागतील म्हणुन माझेकडे लाचेची मागणी केलेली आहे. मी काल दिनांक 30.12.2025 रोजी बाहेरगांवी असल्यामुळे ला. प्र.वि. कार्यालयात तक्रार देण्यासाठी येवू शकलो नाही.
मी आज दिनांक 31.12.2025 रोजी वस्तु व सेवा कर कार्यालय, हिंगोली येथील श्री उमेश सरकटे यांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयात जाणार आहे. त्यांना भेटुन त्यांचे कार्यालयाकडुन माझे दुकानाचे नांवे काढण्यात आलेला प्रोफेशनल टॅक्स, त्यावरील व्याज आणि दंड असा एकुण 43,904/-रू भरण्याचे नोटीस बाबत प्रत्यक्ष बोलणी करणार आहे. तेव्हा श्री उमेश सरकटे यांनी किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही होणेस विनंती आहे, अशा आशयाची तक्रार दिली होती.
सदरचे तक्रारी वरुन कारवाईचे अनुशंगाने शिक्षण विभाग, माध्यमिक, जिल्हा परिषद, हिंगोली यांना दिलेल्या लेखी पत्रकान्वये त्यांनी त्यांचे कार्यालयाचे पंच 1) श्री आकाश विश्वनाथ बांगर, वय 25 वर्षे, व्यवसाय नौकरी,पद-कनिष्ठ लिपीक, वर्ग-3, प्रतिनियुक्ती शिक्षण विभाग, माध्यमिक, जिल्हा परिषद, हिंगोली रा. जिनमाता नगर, हिंगोली 2) श्री विलास ज्ञानेश्वर सदावर्ते, वय 46 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद- वरिष्ठ सहायक वर्ग-3, प्रतिनियुक्तीशिक्षण विभाग, माध्यमिक,जिल्हा परिषद,हिंगोली,रा.नांदेडरोड, वसमत,ता.वसमत,जि.हिंगोली असे ला.प्र.वि.हिंगोली कार्यालयात हजर आले.

दि.31.12.2025 रोजी लाप्रवि कार्यालय हिंगोली येथे तक्रारदार व वर नमुद दोन्ही पंच हजर असताना यातील तक्रारदार यांनी त्यांची तक्रार पंचासमक्ष तोंडी कथन केली. त्यानंतर सदरची तक्रार कार्यालयातील संगनकावर टंकलीखीत करण्यात आली. तक्रारदार यांनी दिलेली तक्रार पंचानी वाचुन पाहिली. तक्रारदार यांची तोंडी कथन केलेली व संगनकावर टंकलीखीत केलेली तक्रार एकच असल्याचे खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. त्यानंतर आमच्या सुचनेवरून पोह श्री मंडलीक यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना व्हॉईस रेकॉर्डर बाबत व त्यामध्ये वापरण्यात येणाऱ्या मेमरीकार्ड बाबत माहिती दिली. त्यानंतर अंदाजे 11.57 वा.व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार श्री भागवत दाहिरे यांचे अंगातील बनियनच्या आतील बाजुस कापडी पिशवीत टाकुन आडकवुन देवुन, तक्रारदार व पंच क्र.1 श्री बांगर यांना लोकसेवक सरकटे यांची वस्तु व सेवा कर कार्यालय हिंगोली येथे भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे मारुती सुझूकी कंपनीचे रिट्स कार क्रमांक एम. एच. 15 सि.डी.7988 ने ला.प्र.वि. कार्यालय, हिंगोली येथुन रवाना केले.

त्यानंतर अंदाजे 12.38 वा. तक्रारदार श्री भागवत दाहिरे व पंच क्र.1 श्री बांगर असे ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली येथे परत आले. त्यावेळी पोह मंडलीक यांनी तक्रारदार श्री भागवत दाहिरे यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर तक्रारदार श्री भागवत दाहिरे व पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र. 1 श्री बांगर यांनी सांगितले की, तक्रारदार व लोकसेवक सरकटे यांची जिल्हा सामाण्य रुग्णालयाच्या कमानीजवळ वस्तु व सेवाकर कार्यालय हिंगोलीच्या समोरील रोडवर भेट झाली. त्यावेळी लोकसेवक, सरकटे हे तक्रारदार यांना म्हणाले की, आता ते त्या हिशोबात माझं म्हणनं होतं समजा.. तिसच्या कमी तं काय साहेब आयकेंनत...तेव्हा तक्रारदार भागवत दाहिरे हे त्यांना म्हणाले किती तेव्हा लोकसेवक त्यांना तिस...म्हणाले असता तक्रारदार भागवत दाहिरे हे त्यांना म्हणाले तिस हजार का....तेव्हा लोकसेवक यांनी हो म्हणुन साहेब तिस म्हणतात. तक्रारदार यांनी त्यांना विचारले कि, साहेब कोणते आपले. तेव्हा लोकसेवक यांनी राउत साहेब असे म्हणुन ते दोघे त्यांचे कामाचे संबधाने एकमेकाशी बोलत होते. तेव्हा तक्रारदार हे त्यांना म्हणाले तुम्हीच सांगा आता तुम्ही तिस म्हणायले तुमच्या आकारानं करा...तस आता तुम्ही बोले..म्हणजे..तेव्हा लोकसेवक सरकटे हे त्यांना म्हणाले पंचविस पर्यत करू का...बोलु का मी सरांना... असे म्हणुन तडजोड करत असतांना लोकसेवक सरकटे हे तक्रारदार यांना म्हणाले येच्यात बी काही नाही..मी विस मध्ये मनतो सरला..तेव्हा तक्रारदार म्हणाले विस हजार रुपये तेव्हा लोकसेवक सरकटे यांनी हो...असे म्हणुन विस मध्ये करून टाका कारण ते बी कस हे की...माझ्याच हिशोबांन मनलो मी..सरांना बोलतो मी काय बोलायचं ते..त्यानंतर लोकसेवक सरकटे हे तक्रारदार यांना म्हणाले की, सगळेकाही आमचेच थोडे हेतं..त्यातले अँडजेस्टमेंन्टचेच सर घेतात..सर आमचे आम्हाला काढुन देणार..त्याहचा वाटा मोठा हे आम्हाला काय दोन चार हजार भेटतात मॅक्झीमम..असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांना पडताळणी कार्यवाही दरम्याण घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली असता, त्यांनी पंच क्रमांक 1 प्रमाणे हकिकत सांगीतली.

दिनांक 31.12.2025 रोजीचे पडताळणी दरम्याण आरोपी लोकसेवक उमेश सरकटे, कर सहायक यांची पंचा समक्ष लाचमागणी पडताळणी केली. पडताळणी दरम्याण तक्रारदार यांचेविरुध्द काढलेली नोटीस कॅन्सल करण्यासाठी व लावण्यात आलेला प्रोफेशनल टॅक्स, त्यावरील व्याज आणि दंड न भरण्यासाठी पंचा समक्ष त्यांचे स्वतः साठी व त्यांचे साहेबासाठी तक्रारदार यांचेकडे 30,000/-रु लाचेची मागणी करून. तडजोडीअंती 20,000 /- रु लाचेची रक्कम उदईक दिनांक 01.01.2026 रोजी स्विकारण्यास सहमती दिल्याचे लाचमागणी पडताळणी दरम्याण निश्पन्न झाले. त्यावरुन दि.01.01.2026 रोजी लोकसेवक सरकटे यांच्या विरुध्द सापळा कारवाई करण्याचे ठरविले.

त्यानंतर दिनांक 01.01.2026 रोजी तक्रारदार दाहिरे हे 20,000/- रु लाचेची रक्कम घेवुन ला.प्र.वि. कार्यालय, हिंगोली येथे हजर आले. त्यावेळी तक्रारदार यांनी, लोकसेवक सरकटे यांची वस्तु व सेवाकर कार्यालय, हिंगोली येथे भेट होईल असे सांगितले. त्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयात आमच्या कक्षामध्ये सापळा पुर्व कारवाईला सुरवात केली. सपोउपनि मोहम्मद युनूस यांनी तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष अँन्थ्रॉसिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पच्या गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्या अनुशंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकातील अंमलदाराना सुचना दिल्या. लोकसेवक, उमेश सरकटे यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांने लाच रक्कम स्विकारल्याबाबत त्यांचे गळ्यातील मफलर उजव्या हातात धरून ईषारा करण्याचे तक्रारदार यांना सुचना दिली. त्यानंतर सपोउपनि मोहम्मद युनूस यांनी लाच रक्कमेला अँन्थ्रॉसिन पावडर लावुन तक्रारदार यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात अलगत ठेवुन दिल्या.

त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे 12.35 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र.1 यांच्यासोबत लोकसेवक,

उमेश सरकटे यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडील कारने वस्तु व सेवा कर कार्यालय, हिंगोली येथे रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ काही अंतराने आम्ही व सापळा पथकातील पोह श्री फुपाटे, पोह श्री मंडलीक, पोह श्री पवार, पोशि श्री. वाघ व पंच क्रं.2 श्री सदावर्ते असे दोन शासकिय व एक खाजगी मोटर सायकलने वस्तु व सेवा कर कार्यालय, हिंगोली कडे रवाना झालो. तेथे गेल्यावर तक्रारदार व पंच क्रमांक 1 श्री बांगर हे तक्रारदार यांचे कारचे खाली उतरले. त्यावेळी आम्ही व सापळा पथकातील अंमलदार असे वस्तु व सेवा कार्यालयाच्या परिसराच्या आवारात जावुन कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावला.
अंदाजे 13.10 वाजता तक्रारदार यांच्याकडुन लोकसेवक, उमेश सरकटे यांनी पंचासमक्ष स्वतः 20,000/- रु. लाच रक्कम स्विकारली असता, तक्रारदार यांनी त्यांना सांगीतल्याप्रमाणे लाच स्विकारल्याचा सापळा पथकास इशारा केला. त्यावेळी आम्ही, लोकसेवक, उमेश सरकटे यांना जिल्हा सामाण्य रूग्णालयाच्या कमानीजवळ वस्तु व सेवाकर कार्यालय हिंगोलीच्या समोरील रोडवर ताब्यात घेतले. त्यावेळी सापळा पथकातील पोह/पवार यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईसरेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही आमचा,पंचाचा व सापळा पथकातील सदस्याचा परिचय देवुन लोकसेवक सरकटे यांना त्यांचा नाव, गाव पत्ता विचारला असता त्यांनी उमेश साहेबराव सरकटे, वय 33 वर्ष, पद - कर सहायक, वस्तु व सेवाकर विभाग, कार्यालय, हिंगोली, मुपो.हराळ, ता. रिसोड, जि.वाशिम असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारपुस केली असता त्यांनी स्विकारलेली अँन्थ्राँसिन पावडर युक्त 20,000/- रू लाच रक्कम त्यांचे पॅटच्या खिशातुन काढुन दिल्याने ती पंचा समक्ष हस्तगत करण्यात आली आहे. सदर बाबत सविस्तर सापळा कारवाई पंचनामा करण्यात आलेला आहे.
तरी तक्रारदार श्री. भागवत वामन दाहिरे, वय 30 वर्श, व्यवसाय कृषी केंद्र चालक, रा. इंदिरा नगर, सेनगांव, ता. सेनगांव, जि.हिंगोली. ह.मु. पोळा मारोती जवळ, मंगळवार बाजार, हिंगोली यांनी दिनांक 31.12.2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 31.12.2025 रोजी पडताळणी पचंनामा व दिनांक 01.01.2026 रोजी केलेल्या सापळा पुर्व व सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक, उमेश साहेबराव सरकटे, वय 33 वर्ष,पद -कर सहायक,वस्तु व सेवाकर विभाग,कार्यालय, हिंगोली,मुपो.हराळ,ता. रिसोड,जि.वाशिम यांनी तक्रारदार भागवत दाहिरे यांना,त्यांचे पाटील कृषी सेवा केंद्र अँन्ड मशनरीज या दुकानावर लावण्यात आलेल्या प्रोफेशनल टॅक्स, त्यावरील व्याज आणि दंड असे 43,904/-रू काढलेली नोटीस कॅन्सल करण्यासाठी, अन अँडजेसमेंट करायची असेल तर उर्वरीत फिर्यीद पुढील प्रमाने आहे-
अन अँडजेसमेंट करायची असेल तर त्यासाठी 30,000/- रू स्वतः लाचेची मागणी करून तडजोडी अंती 20,000/- रू लाचेची मागणी करून, आज दिनांक 01.01.2026 रोजी 13.10 वा.चे सुमारास सापळा कारवाई दरम्यान जिल्हा सामाण्य रूग्णालयाच्या कमानीजवळ वस्तु व सेवाकर कार्यालय हिंगोलीच्या समोरील रोडवर 20,000/- रू लाच रक्कम पंचा समक्ष स्वतः स्विकारली आहे.
म्हणुन माझी आरोपी लोकसेवक, उमेश साहेबराव सरकटे, वय 33 वर्ष, पद - कर सहायक, वस्तु व सेवाकर विभाग, कार्यालय, हिंगोली, मुपो.हराळ, ता. रिसोड, जि.वाशिम यांच्या विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

(विकास घनवट)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,हिंगोली.

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation:
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):
RAJESH HANMANLU MALPILU
Rank (पद): SI (Sub-Inspector) No.(क्र.): 15101000402RH
to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

विकास घनवट
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली.

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे.हिंगोली (श.)

Name (नाव): SANDEEP KHANDER
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.):